# *[GOOD WORK OF NAGPUR RURAL POLICE]*

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**दिनांक १९/०५/२०१६ (गुरुवार)**

## नागपूर (ग्रामीण) पोलीस मुख्यालय येथे महाराष्ट्र पशुसंवर्धन व इतर कायद्यांवर चर्चासत्र संपन्न

दिनांक १७/०५/२०१६ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस मुख्यालय, टेकानाका येथील ''दिवाने-ए-आम'' सभागृहामध्ये पोलीस अधीक्षक श्री. अनंत रोकडे यांचे मार्गदर्शनाखाली आयोजीत बैठकीमध्ये महाराष्ट्र पशुसंवर्धन कायदा-१९७६ सुधारीत १९९५ (४ मार्च २०१५ पासुन लागु), केंद्रीय मोटर वाहन नियम - २०१५, पर्यावरण संरक्षण कायदा - १९८६, अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम - २०१६, पशु कृरता अधिनियम, पशु वाहतुक अधिनियम, महानगर पालिका प्रांतीक अधिनियम, महाराष्ट्र किपींग ॲन्ड मुव्हमेंट ऑफ कॅटल इन अर्बन एरिया कंट्रोल ॲक्ट, मुंबई पोलीस ॲक्ट या विषयांवर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राला प्रमुख पाहुणे म्हणुन **सुकृत निर्माण चेरीटेबल ट्रस्टचे** अध्यक्ष श्री. कनकराय एस. सावडीया व श्री. कनुभाई सावडीया यांना आमंत्रित करण्यात आलेले होते. या चर्चासत्रामध्ये प्रमुख पाहुण्यांनी नागपूर (ग्रामीण), जिल्हयातील उपस्थित सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदार यांना वरील कायद्याची विस्तृत व कलमांसहीत अद्यावत माहिती देण्यात आली.

या व्यतिरीक्त एफ.आय.आर. मध्ये कोणते मुद्दे आले पाहीजे, किंवा ते कसे लिहावे. की जेणे करुन आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा मिळेल. आणि पोलीसांना सुध्दा याबाबत योग्य ते मार्गदर्शन होईल. असे या चर्चासत्रा दरम्यान पोलीस अधिकारी यांना मार्गदर्शन करण्यात आले. सोबतच सुकृत निर्माण चेरीटेबल ट्रस्ट कडुन एक किट वितरण करण्यात आली, ज्यामध्ये वरिल कायद्यासंबधीत मार्गदर्शक पुस्तीका होती.

या चर्चासत्राला अपर पोलीस अधीक्षक श्री. नरसिंग शेरखाने, यांचेसह इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



**<u>महाराष्ट्र व मध्यप्रदेश आंतरराज्य</u>**
**<u>अपराध समीक्षा बैठक-२०१६ संपन्न</u>**
**<u>दिनांक ०१/०६/२०१६ (बुधवार)</u>**

दिनांक ३१/०५/२०१६ रोजी सकाळी ११.०० ते १५.०० वा. दरम्यान रेमन्ड बोरगाव रेस्ट हाउस सौंसर जिल्हा छिंदवाडा (म.प्र.) येथे महाराष्ट्र व मध्यप्रदेश आंतरराज्य समन्वय बैठक मा. श्री. आर. पी. सिंह (भा.पो.से) पोलीस उपमहानिरीक्षक, छिंदवाडा रेंज, छिंदवाडा मध्यप्रदेश यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस दोन्ही प्रदेशातुन खालील पोलीस अधिकारी हजर होते.

| **महाराष्ट्र राज्यातील सभेला उपस्थित अधिकारी** | **मध्यप्रदेश राज्यातील सभेला उपस्थित अधिकारी** |
|---|---|
| १. श्री. अंनत रोकडे (भा.पो.से) पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण जिल्हा नागपूर<br>२. श्री. दिपक सांळुके (भा.पो.से) सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधीकारी विभाग रामटेक जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>३. श्री. ईश्वर कातकडे उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग काटोल जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>४. श्री. सुरेश भोयर उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग सावनेर जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>५. श्री. किशोर गवई उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग मोर्शी जिल्हा अमरावती<br>६. श्री. संजय पुरंदरे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>७. श्री. चंद्रशेखर बहादुरे पोलीस निरीक्षक जिल्हा विशेष शाखा जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>८. श्री. बी. एम. गायगोले पोलीस निरीक्षक पोस्टे पारशिवनी जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>९. श्री. चंद्रशेखर ढोले पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा नागपूर शहर<br>१०. श्री. उल्हास भुसारी सहा. पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा जिल्हा नागपूर ग्रामीण. | १. श्री. आर. पी. सिंह (भा.पो.से) पोलीस उपमहानिरीक्षक छिंदवाडा परिक्षेत्र छिंदवाडा मध्यप्रदेश<br>२. श्री. डॉ. जी. के. पाठक (भा.पो.से) पोलीस अधीक्षक छिंदवाडा मध्यप्रदेश.<br>३. श्री. ऐ. के. पांडे (भा.पो.से) पोलीस अधीक्षक सिवनी मध्यप्रदेश.<br>४. श्री. आर. के. त्रिपाठी अपर पोलीस अधीक्षक जिल्हा छिंदवाडा मध्यप्रदेश.<br>५. श्री. बी. आर. चौहान उपविभागीय पोलीस अधीकारी उपविभाग सौंसर मध्यप्रदेश.<br>६. श्री. जयंत टेंभरे उपविभागीय पोलीस अधीकारी उपविभाग पांढुर्णा मध्यप्रदेश.<br>७. श्री. बी.एस. बारिवा उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग अमरवाडा जिल्हा छिंदवाडा मध्यप्रदेश<br>८. श्री. के.के. वर्मा उप पोलीस अधीक्षक थाना अजाक जिल्हा छिंदवाडा<br>९. श्री. बी. के. बावरीया डी.एस.पी. महिला प्रकोष्ठ जिल्हा छिंदवाडा<br>१०. श्री. के. के. त्रिवेदी पोलीस निरीक्षक पोस्टे पांढुर्णा<br>११. श्री. केशव पटेल पोलीस उपनिरीक्षक पोस्टे सौंसर जिल्हा छिंदवाडा |

| | |
|---|---|
| ११. श्री. अनिल मांडवे सहा. पोलीस निरीक्षक पोस्टे खापा जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>१२. श्री. योगेश पारधी सहा. पोलीस निरीक्षक पोस्टे केळवद जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>१३. श्री. धर्मेंद्र जोशी सहा. पोलीस निरीक्षक पोस्टे सावनेर जिल्हा नागपूर ग्रामीण.<br>१४. श्री. विजय खेरडे पोलीस उपनिरीक्षक पोस्टे नरखेड जिल्हा नागपूर ग्रामीण<br>१५. श्री. चित्तरंजन चांदुरे सहा. पोलीस निरीक्षक पोस्टे वरूड जिल्हा अमरावती<br>१६. श्री. शांतीकुमार पाटील सहा. पोलीस निरीक्षक पोस्टे बेनोडा जिल्हा अमरावती | १२. श्री. लाखनसिंह राजपुत सहा. पोलीस उपनिरीक्षक पोस्टे लोधीखेडा जिल्हा छिंदवाडा<br>१३. श्री. एस.पी. सिंह बघेल पोलीस उपनिरीक्षक चौकी बडचिचोली जिल्हा छिंदवाडा<br>१४. श्री. आय. एल. धर्वे उपनिरीक्षक (रेडीयो) जिल्हा छिंदवाडा<br>१५. श्री. चंदनसिंह उईके पोलीस उपनिरीक्षक जिल्हा विशेष शाखा जिल्हा छिंदवाडा<br>१६. श्री. डी.एस. उईके पोलीस उपनिरीक्षक चौकी पिपला नारायणवार जिल्हा छिंदवाडा |

बैठकीस उपस्थित असलेल्या पोलीस अधिकारी यांना मा. श्री. आर. पी. सिंह (भा.पो.से) पोलीस उपमहानिरीक्षक छिंदवाडा रेंज छिंदवाडा मध्यप्रदेश, श्री. अंनत रोकडे (भा.पो.से) पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) जिल्हा नागपूर, श्री. डॉ. जी.के. पाठक (भा.पो.से) पोलीस अधीक्षक, छिंदवाडा मध्यप्रदेश, श्री. ऐ. के. पांडे (भा.पो.से) पोलीस अधीक्षक, सिवनी मध्यप्रदेश यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर सिमावर्ती दोन्ही राज्यातील पोलीस स्टेशन ला नियमित कामाकाजा दरम्यान येणाऱ्या अडी-अडचणीच्या अनुषंगाने कायदेशिर बाबींवर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेत खालील विषयांवर उपस्थित अधीकाऱ्यांकडुन सुचना व त्यांना येणारे अडचणी जाणुन घेण्यात आल्या.

**<u>बैठकीत उपस्थित केलेले मुद्दे:-</u>**

१. कत्तली करीता होत असलेली गोवंश वाहतुकीवर निर्बंध लावण्याकरीता करावयाच्या उपायोजना.

२. अवैध दारू/ मादक पदार्थांची वाहतुकीवर निर्बंध लावण्याकरीता करावयाच्या उपायोजना.

३. आरोपी परराज्यातील निवासी असल्याकारणास्तव त्यांचे तामिल न होवु शकलेले स्थायी व गैर जमानती वारंट तात्काळ परस्परांशी संपर्क करून तामिल करून प्रकरणांचा निपटारा करणे.

४. कलम १७३ (८) सीआरपीसी प्रमाणे आरोपी फरार असल्याने कलम २९९ सीआरपीसी अन्वये फरारी आरोपींच्या नावांची देवाणघेवाण करून संबंधीत क्षेत्रातुन त्यांना अटक करून प्रकरणांचा निपटारा करणे.

५. अपातकालीन परिस्थितीत दोन्ही राज्यातील पोलीस दलात तात्काळ माहितीचे आदनप्रदान करण्याकरीता बिनतारी संदेशची दर्जेदार व्यवस्था निर्माण करण्याकरीता नागपूर ग्रामीण जिल्हयातील व मध्यप्रदेश येथील सिमावर्ती पोलीस स्टेशन मध्ये बिनतारी संदेशाद्वारे माहितीची आदनप्रदान सुरू करण्यात आली.

६. घटनेनंतर आरोपीतांचे अवागमनावर निर्बंध लावण्याकरीता सिमावर्ती भागात करावयाची नाकाबंदी यावर चर्चा करून नाकाबंदीचे ठिकाणे निश्चित करण्यात आली.

७. महाराष्ट्र व मध्यप्रदेश येथील सिमावर्ती पोलीस स्टेशन प्रभारी यांनी नियमित ऐकमकांच्या संपर्कात राहुन माहितीचे आदानप्रदान व्हावे या हेतुने व्हॉटसअप गृप तयार करण्यात आला.

८. हरविलेल्या इसमांची व उघडकीस न आलेले खुनासारख्या गंभीर अपराधांबाबत चर्चा केली असता मृतकांची ओळख पटुन न आल्याने बहुतांश: खुनाचे गुन्हे उघडकीस आले नसल्याचे निर्दशनास आले.त्या अनुषंगाने दोन्ही राज्यातील पोलीस स्टेशनचे संयुक्त मिसींग मेळावा आयोजित करण्याची तजवीज ठेवण्यात आली.

९. प्रिएमएलसी/पोस्टमार्टम रिपोर्ट/एफएसएल रिपोर्ट प्राप्त करण्याकरीता परस्परांना मदत करण्याबाबत वरिष्ठांकडुन निर्देश देण्यात आले तसेच संबंधीत विभागांतील वरिष्ठांशी चर्चा करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

१०. जिल्हयातील पोलीस अधिकारी यांना तात्काळ परराज्यातील पोलीस अधिकारी यांच्याशी संपर्क करण्याकरीता कम्युनिकेश प्लॅन तयार करून सर्व पोलीस अधिकारी यांचा टेलीफोन नंबरची तसेच ईमेल आयडी ची आदानप्रदान करण्यात आले.

११. व्हीआयपी सिक्युरीटी दरम्यान येणाऱ्या अडचणी व त्या अनुषंगाने करावयाच्या उपययोजना याबाबत चर्चा करण्यात आली.

१२. कुठल्याही राजकीय पक्षाने त्यांचे मागणी करीता केलेल्या रस्ता रोको किंवा आंदोलन मुळे सामान्य जनतेस त्रास होवु नये या उद्देशाने अशा आंदोलनाच्या माहितीची आदानप्रदान करण्याची तजवीज ठेवण्यात आली.

१३. दोन्ही राज्यात सद्या प्रामुख्याने कार्यरत असलेल्या गुन्हेगारी टोळयांची सविस्तर माहितीची आदानप्रदान करण्यात आली.

१४. दोन्ही राज्यातील वाहन चोरीवर निर्बंध लावण्याकरीता काय उपाययोजना करण्यात येवु शकतात याबाबत चर्चा करण्यात आली.

१५. दोन्ही राज्यात सिमावर्ती भागात मोठया प्रमाणात जंगल परिसर असल्याने वाघ व अन्य जंगली श्वापदाची शिकार व त्यांचा अवयवांच्या तस्करीवर निर्बंध लावण्याकरीता संयुक्त रित्या करावयाच्या उपाययोजनाबाबतची चर्चा करण्यात आली.

सदर बैठकीत चर्चा करण्यात आलेल्या मुद्दयांवर वरिष्ठांनी दिलेल्या निर्देशांची अंमलबजावनी होते किंवा कसे ? याबाबत भविष्यात लवकरात लवकर संयुक्त आढावा बैठक घेण्याचे नियोजित आहे. तसेच माहितीचे आदानप्रदान होण्याच्या अनुषंगाने कामात सुसूत्रता आणण्याचे हेतुने

त्रैमासिक आंतरराज्य संयुक्त बैठक घेण्याचे विचाराधीन आहे. सदर बैठक ही अत्यंत स्नेहपुर्ण वातावरणात घेण्यात आलेली असुन सिमावर्ती पोलीस अधिकारी यांचा परस्परांशी परिचय झाल्याने यापुर्वी येणाऱ्या अडचणींवर ते तात्काळ संपर्क करून समस्येचे निराकरण करतील असा शुभ संदेश या बैठकीतुन मिळालेला आहे.



# <u>पोलीस अधीक्षकांकडुन कडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना भावपुर्ण निरोप</u>

दिंनाक ३१/०५/२०१६ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकरी व कर्मचाऱ्यांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण), येथे भावपुर्ण निरोप देण्याकरीता '' **निरोप समांरभाचा कार्यक्रम**'' आयोजीत करण्यात आलेला होता. यावेळी १) सपोउपनि. वसंता श्यामरावजी गोरडे,( वाहतुक शाखा), २) श्रीकृष्ण मोहनसिंग रेहपाडे, (पो.मूख्यालय), ३) गणपती गणेश पठाणे, (पो.स्टे.खापा), ४) मनोहर नारायण कालसर्पे, (पो. मूख्यालय), ५) साजीद गलमुर्तेजा शेख, (पो.मूख्यालय), ६) पो. हवा. सैयद बाहोद्दीन सैसद ईब्राहीम रिझवी (पो.स्टे.जुनी कामठी), ७) मुस्ताक मो. ईशाक शेख, (पो.स्टे. खापा), ८) यशवंत महादेवराव तामतागडे, (पो.मूख्यालय), ९) रुपराव माहीपत वाडीभस्मे, (पो.मूख्यालय), या सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना पोलीस अधीक्षक श्री. अंनत रोकडे यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे.

यावेळी उपस्थित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाार यांना पोलीस अधीक्षक श्री. अंनत रोकडे यांनी आपले पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सेवामुक्ती नंतर त्यांना त्यांच्या मिळणाऱ्या पेंशन संबधी तसेच इतर कोणत्याही कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही, अशी ग्वाही पोलीस अधीक्षकांनी दिली. तसेच पोलीस दलात सेवानिवृत्त पंर्यतचा कालावधी यशस्वीरित्या पार पाडला याबद्दल त्यांनी सेवानिवृत्त पो.अधिकारी, कर्मचारी यांची प्रशंसा केली. या कार्यक्रमाला पोलीस उपअधीक्षक (गृह) व इतर अधिकारी आणि कार्यालयातील कर्मचारी (स्टाफ), हजर होता.






**<u>नागपूर जिल्हा (ग्रामीण),</u>**
**<u>नागपूर</u>**